महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चा नियम २३

---

कार्यवाहीबाबतच्या सूचनांचा पुनरुच्चार

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक वशिअ-१११७/प्र.क्र. १४०/११**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २९ डिसेंबर, २०१७

<u>पहा</u> :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र सीडीआर-१००६/ प्र.क्र.१२/०६/अकरा, दि. १७.०८.२००६

**<u>परिपत्रक</u>**

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ च्या तरतुदीन्वये, कोणताही शासकीय कर्मचारी त्याच्या शासकीय सेवेसंबंधीच्या कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणावर कोणताही राजकीय किंवा इतर बाह्य दबाव आणणार नाही किंवा तसा प्रयत्न करणार नाही असे विहित करण्यात आले आहे. त्यानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबींसंबंधीच्या तक्रारीचे निवारण करुन घेण्यासाठी तसेच वैयक्तिक कामे करुन घेण्यासाठी राजकीय कार्यकर्ते व अन्य अशासकीय व्यक्तींमार्फत दबाव आणल्याचे आढळून आल्यास ते शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतात. अशा प्रकरणी करावयाच्या कारवाईसंबंधीच्या सूचना शासनाने वेळोवेळी निर्गमित केल्या आहेत. यासंबंधीच्या अद्ययावत सूचना वर नमूद दिनांक १७ ऑगस्ट, २००६ च्या परिपत्रकात समाविष्ट आहेत.

२. सदर शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७ ऑगस्ट, २००६ मधील सूचनांन्वये, शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याने त्याच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणावर दबाव आणल्याचे वा तसा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास प्रथम संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्याकडून त्याबाबत खुलासा घेण्यात यावा. तसेच, असा खुलासा करताना संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यास "आपला अशा पत्रव्यवहाराशी संबंध नसून त्याची दखल घेऊ नये" असे स्पष्टपणे कळविल्याखेरीज संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यासंदर्भात प्राप्त झालेल्या पत्रव्यवहाराची/शिफारशींची दखल घेण्यात येऊ नये. अन्यथा, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची सदर पत्रव्यवहारास वा कृतीस अप्रत्यक्ष संमती वा मूकसंमती गृहीत धरून संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार समुचित शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्याने शिस्तभंगाची कारवाई करावी, असे कळविण्यात आले आहे. सदर सूचनांकडे सर्व संबंधितांचे पुन्हा लक्ष वेधण्यात येत आहे. लोकप्रतिनिधींनी स्वत:हून अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींसंदर्भात विनंती / शिफारस केल्यास त्याचा विचार करण्यास वरील सूचनांद्वारे प्रतिबंध करण्यात आलेला नाही, याकडेही लक्ष वेधण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेताक २०१७१२३०१७१४१८६३०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramakant Shivajirao Ghatge

Digitally signed by Ramakant Shivajirao Ghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=G.A.D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=927f16b596a85f3f04b621916641eefd1bb6b4367c467eb0b061a30ce41ba8ec, cn=Ramakant Shivajirao Ghatge
Date: 2017.12.30 18:11:59 +05'30'

(र.शि.घाटगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव,
२. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
३. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
४. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
५. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा,
६. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद,
७. मुख्य सचिव,
८. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
९. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,
१०. सर्व मंत्रालयीन विभाग,
११. मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख,
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१५. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१६. *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१८. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२०. सर्व विधानमंडळ सदस्य,
२१. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३. <u>निवडनस्ती</u>

* पत्राने